https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२६४ | बुधवार,दि.२८ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-264 | Wednesday, Dt.28 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# पत्नीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून मित्राची हत्या ; एकजण जखमी,केज तालुक्यात खळबळ

केज (प्रतिनिधी)-

पत्नीशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून केज तालुक्यातील भाटुंबा येथील २७ वर्षीय युवकाची झाडाला बांधून अमानुष मारहाण करून हत्या करण्यात आली.ही धक्कादायक घटना सोमवारी दि.२६ मे रोजी सायंकाळी घडली असून या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.एकजण या घटनेत गंभीर जखमी झाला असून, सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. व एक आरोपी फरार आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,मयत दगडू उर्फ अण्णा ज्ञानेश्वर धपाटे रा. भाटुंबा हा त्याचा मित्र सचिन करपे याच्या सोबत दुचाकीवरून जात असताना सावळेश्वर (पैठण) येथील वैभव मस्के याने त्याला मामाच्या शेतात बोलावून घेतले.तेथे आधीच थांबलेल्या रोहन उर्फ रोहित मस्के, सुहास पाटोळे,राजेश जंगले,अन्वर पठाण, आशिष अंबाड व इतरांनी दोघांनाही पकडून एका झाडाला बांधले.लाकडी काठी व चमड्याच्या पट्ट्याने दोघांना अमानुष मारहाण करण्यात आली.या मारहाणीमुळे दगडू गंभीर जखमी झाला होता.त्याला औरंगपूर शिवारातील पावनधाम मंदिर परिसरात रस्त्याच्या कडेला टाकून आरोपी पळून गेले.त्यानंतर मृताच्या भावास फोन करून संपूर्ण घटनेची माहिती दिली.भावाने व गावकऱ्यांनी तात्काळ दगडू व सचिन यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले.मात्र,उपचारा पूर्वी च दगडू ला मृत घोषित करण्यात आले.सचिन करपे याच्यावर उपचार सुरु आहेत.

## सहा आरोपींना अटक, एक फरार

या प्रकरणी मृताचा भाऊ सिद्धेश्वर धपाटे यांच्या फिर्यादीवरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात सात जणां विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांच्या नेतृत्वा खाली पोलिसांनी त्वरीत कारवाई करत सहा आरोपींना अटक केली आहे.आशिष अंबाड हा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

## पोलीस अधिकाऱ्यांचा घटनास्थळी पाहणी दौरा

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे आणि पोलीस उप निरीक्षक राहुल पतंगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मृताच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवण्यातआले आहेत.मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास दगडू धपाटे याच्यावर भाटुंबा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



# भैय्या पाटील विरुद्ध बीड पोलिसांत गुन्हा दाखल

## जाती-जातीत द्वेष, विशिष्ट समाजाला गुन्हेगार म्हणून सोशल मीडियावर विखारी लिखाण

बीड - मस्साजोग सरपंच हत्ये पासून सोशल मीडियावर द्वेषमूलक लिखाण करून जाती जातीत द्वेष पसरवून तेढ निर्माण करणे, भडकाऊ मजकूर प्रसिद्ध करणे, एका संपूर्ण जातीला गुन्हेगार ठरवणारे लिखाण करणाऱ्या, तसेच पोलिस अधिकाऱ्यांची नावे, जाती लिहून त्यांच्यावर तथ्यहीन आरोप करणाऱ्या शेकडो पोस्ट फेसबुक व एक्स सोशल मीडियावर करून जाती जातीत विष पसरीविण्याचे काम करणाऱ्या भैय्या पाटील नामक व्यक्ती विरुद्ध बीड सायबर पोलीस ठाण्यात सोमवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भैय्या पाटील याने बीड जिल्हा घडणाऱ्या विविध घटनांचा आधार घेऊन एका संपूर्ण जातीला गुन्हेगार ठरवणारे द्वेषमूलक लिखाण केले आहे व आजही ते सुरू आहे. बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत यांनी जाती विषयक पोस्ट करण्यारांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार काही सामाजिक कार्यकर्त्यांनी भैय्या पाटील विरुद्ध सात एप्रिल रोजी फिर्याद दिली होती. अखेर तपासाअंती सायबर पोलिसांनी सोमवारी रात्री उशिरा माहिती तंत्रज्ञान कायदा ८४ल तसेच बी एन एस १९६ कलमंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक उस्मान शेख करत आहेत.

भैय्या पाटील हा पूर्वी उपमुख्यंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या कार्यालयात जन संपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होता. मात्र त्याच्या सततच्या जातीयवादी भूमिकेमुळे दीड वर्षांपूर्वी अजित पवार यांनी त्यांच्या कार्यालयातून भैय्या पाटील याची हकालपट्टी केली असल्याची माहिती असून तो सध्या शरद पवार गटाच्या सोशल मीडिया विभागाचा प्रमुख पदाधिकारी आहे.

## Short NEWS

### एकही आपत्तीग्रस्त मदतीपासून वंचित राहू नये - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

लातूर।प्रतिनिधी

जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान आणि काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करावेत आणि एकही आपत्तीग्रस्त व्यक्ती मदतीपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. तसेच, मान्सून कालावधीत प्रशासनाने प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. (उर्वरीत पान २ वर)

### नाद-स्वर-चैतन्य संगीत अकादमीमध्ये सातवी शास्त्रीय संगीत सभा संपन्न


बीड ।प्रतिनिधी

शहरातील सहयोग नगर भागीतल नाद-स्वर-चैतन्य संगीत अकादमीमध्ये सातवी शास्त्रीय संगीत सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या संगीत सभेत हरीश नखाते यांचे स्वतंत्र तबला वादन व सुरंजन जायभाये आणि भक्ती जायभाये यांच्या शास्त्रीय गायनाने सुरुवात झाली. सभेमध्ये सुरुवातीला हरीश नखाते यांनी तबला वादनात ताल तीन ताल मध्ये घराणेदार कायदे, रेले, पारंपरिक बंदिशी व अतिशय तयारीचे वादन सादर केले. त्यानंतर सुरंजन जायभाये यांनी राग बागेश्रीने मैफिलीची सुरुवात केली. कु. भक्ती हीने घेई छंद मकरंद हे नाट्यगीत अतिशय ताकदीने

(उर्वरीत पान २ वर)

### माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त ३१ मे रोजी जन्मणाऱ्या मुलींच्या नावे ५ हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करणार - मडके

गेवराई ।प्रतिनिधी



जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्म घेणार्या मुलींच्या भवितव्यासाठी पाच हजार रुपयांचे फिक्सडिपॉझिट करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ.अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांनी अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या दोन वर्षांपासून या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले आहे. दि. ३१ मे रोजी जन्मलेल्या मुलींच्या

(उर्वरीत पान २ वर)

### आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेतीचे धडे

बीड ।प्रतिनिधी

आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाबरोबर आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी करावी. यात जमिनीची योग्य निवड, सिंचन, खत आणि कीटकनाशकांचा योग्य वापर कसा करावा. तसेच पीक व्यवस्थापनाचे तंत्रज्ञान कसे असावे याचे प्रात्यक्षिक थेट शेतीत केले जाते. दरवर्षी येथे विद्यार्थी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला विद्यार्थी पिकवतात

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कृषी शिक्षणाबरोबर शास्त्रीय शेती प्रात्यक्षिकांचे धडे प्रगतशील

(उर्वरीत पान २ वर)

# पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा, बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा

## डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



बीड ।प्रतिनिधी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्रामध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हमीभाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते करिता डी.एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तेते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि पत्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ चे इष्टांक रु १७०७

(उर्वरीत पान २ वर)

# शेतकरी बांधवांच्या अडचणींबाबत उपाययोजना करा

## आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध अडचणी आणि मागण्यांच्या संदर्भात शासन आणि प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन अणि प्रशासनाकडे केली आहे.



अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी,सन २०२० व २०२३-२४ चा रखडलेला संपूर्ण पिक विमा सरसकट देण्यात यावा,तसेच जे शेतकरी विम्यापासून वंचित राहीले आहेत त्यांना १०० टक्के विमा देण्यात यावा,सन २०२३-२४ मधील अतिवृष्टी अनुदानाची रक्कम तात्काळ शेतकर्यांना वितरीत करावी,शेतीचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी मदत मिळावी,खरीप हंगामासाठी लागणारे बी-बियाणे योग्य दरात मिळावेत. तसेच पारदर्शक आणि योग्य पद्धतीने शेतकर्यांपर्यंत पोहोचावेत,बीजोत्पादक व शेडनेट धारक शेतकर्यांचा पीक विमा योजनेत सामावेश करावा. तसेच त्यांना इतर सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच शासकीय नुकसान भरपाई मिळावी, बीज उत्पादक कंपन्यांना शेडनेट धारक शेतकऱ्यांच्या बाबत हिताचे निर्णय घेणे बंधनकारक करावे,शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य जास्त भाव देण्यात यावा,शेतकरी बांधवांना सोलार पंप उपलब्धतेसाठी सुनियोजन व्हावे,कपाशी पिकाला किमान १२ ते १४ हजार रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीन पिकाला ८ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊन आर्थिक सहकार्य करावे,शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन आर्थिक बळकटी द्यावी. तसेच नवीन पीक कर्ज देण्यासाठी बँकाना तातडीने सुधारीत आदेश द्यावेत.



बीड - दत्त संस्थान कोल्हारवाडी फाटाचे मठाधिपती ह.भ.प. परमपूज्य गुरुवर्य महंत श्रीहरी महाराज पवार यांची तपो निधी पंचायती आनंद आखाड्याने धर्माचार्यपदी नियुक्ती केल्याबद्दल त्यांचे दत्त संस्थान येथे सपत्नीक स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी जिल्हा संघटनेचे सचिव सुरेश पिंपळे यांचे कुटुंबीय सह भक्तगण.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंतीदिनानिमित्त

## पोद्दार हॉस्पिटलच्या १४९ व्या अस्थिरोग शिबिरात १२४ रुग्णांची मोफत तपासणी - उपचार

लातूर ।प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंती दिनानिमित्त लातूरच्या पोद्दार अक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४९ व्या मोफत

अस्थिरोग तपासणी व उपचार शिबिरात एकूण १२४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.या शिबिराचे उदघाटन अतिरिक्त पोलीस अधिक्षक अजय देवरे , उद्योजक दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार, प्रोजेक्ट चेअरमन किरण दंडे, मोतीलाल वर्मा, राजेश दायमा, संतोष गांधी, प्रमोद हाडगावे

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## ५३ व्या संयुक्त कृषि संशोधन विकास समिती- २५ व विकसित कृषि संकल्प अभियान

वनामकृवि, परभणी व कृषि परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील चारही कृषि विद्यापीठाची ५३ व्या संयुक्त कृषि संशोधन विकास समिती- २०२५ चे आयोजन २९ ते ३१ मे, २०२५ दरम्यान वनामकृवि, परभणी येथे करण्यात आले आहे. देशभरात दि २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यानच्या विकसित कृषि संकल्प अभियान राबविले जाणार आहे. या दोन्ही समारंभाचे उद्घाटन २९ मे रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजित पवार यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि मंत्री मा. ना. अॅड. माणिकरावजी कोकाटे राहणार असून कुलगुरू मा. प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे स्वागताध्यक्ष आहेत. पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री मा. ना. श्रीमती पंकजाताई मुंडे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, उर्जा, महिला व बालकल्याण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्हा पालकमंत्री मा.ना. श्रीमती मेघनाताई साकोर बोर्डीकर, कृषि, वित्त, नियोजन, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा.ना. अॅड. आशिष जयस्वाल, कृषि परीषदेचे उपाध्यक्ष मा. ना. मा. श्री तुषार पवार यांची प्रमुख उपस्थिती आहे. परभणी जिल्ह्यातील राज्यसभा सदस्य, लोकसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य व विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव, कृषि परिषदेचे महासंचालक, कृषि आयुक्त, कुलगुरू हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आहेत. सर्व संचालक यांच्यासह जवळपास तीनशे शास्त्रज्ञ उपस्थित रहाणार आहेत. महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठांनी केलेले संशोधन शेतकरी बांधवापर्यंत पोहोचविण्यासाठी महत्वाचा टप्पा मानल्या जाणा-या बैठकीचे आयोजन दरवर्षी एका कृषी विद्यापीठात करण्यात येते. यावर्षी परभणी कृषी विद्यापीठास बैठक आयोजित करण्याचा मान प्राप्त झाला. विद्यापीठांच्या संशोधनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वतता निर्माण करण्यासाठी ३६ नवीन वाणांसह साधारणतः २४७ तांत्रिक शिफारसी या बैठकीत मांडण्यात येणार आहेत. तसेच या माध्यमातून शेतकऱ्यांच्या अडचणींवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाययोजना सुचवण्यात येतात.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

### भाजपचा 'शंखनाद'

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांचे जवळपास तीन वर्षांपासून भिजत पडलेले घोंगडे सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर निकाली निघाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. याबाबतची अधिसूचनादेखील चार आठवड्यांत काढण्याचे निर्देश दिले आहेत. या निवडणुका घेताना ओबीसी आरक्षणाबाबत सन २०२२ च्या आधीची परिस्थिती होती, ती कायम ठेवण्याचे न्यायालयाने सांगितले आहे. एकप्रकारे न्यायालयाने आपला निर्णय देताना यात कोणतीच पळवाट ठेवलेली नाही. पावसामुळे या निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात, असा एक मतप्रवाह सुरू होता. मात्र, पावसाने देखील वेळेआधीच हजेरी लावत न्यायालयाच्या निर्णयाला आपले समर्थन असल्याचे दाखवून दिलेले दिसते. न्यायालयाच्या निर्णया नंतर देखील राजकीय पातळीवर या निवडणुकांबाबतचे वातावरण म्हणजे 'इतना सन्नाटा क्यू है भाई।' असेच होते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात या निवडणुका होणार की, पुन्हा राज्यात प्रशासकीय राजवट सुरू राहून ही पंचवार्षिक प्रशासकीय राजवटीची ठरणार, असा संभ्रम होता. मात्र, हा संभ्रम आता दूर झाला आहे. कारण भाजपचे चाणक्य म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तीन दिवसांच्या महाराष्ट्राच्या विशेष दौऱ्यावर दाखल झाले आहेत. नांदेड येथील सभेने त्यांनी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकांचा बिगुल फुंकला आहे. भाजपकडून या सभेला 'शंखनाद' असे नाव देण्यात आले आहे. गृहमंत्री शहा यांच्या सभेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचारात भाजपने एकप्रकारे आघाडी घेतली आहे. भाजपने केलेला हा शंखनाद म्हणजे आता निवडणुका होणारच, हे निश्चित झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबण्यामागे भाजपचे राजकारण असल्याचे बोलले जात आहे. केंद्रात व राज्यात मित्रपक्षांच्या सहाय्याने सत्तेत असणाऱ्या भाजपला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले प्राबल्य वाढवायचे आहे. केंद्रात दीर्घ कालावधीनंतर सत्ता मिळविण्यासाठी भाजपला 'मोदी' नावाच्या वलयाची, नेतृत्वाची गरज पडली. केंद्रातील सत्तेचा पाया अटलबिहारी वाजपेयी यांनी घालून दिला व त्यावर कळस चढवण्याचे काम नरेंद्र मोदी यांनी आपल्या वेगळ्या कार्यशैलीद्वारे केले. दीर्घ कालावधीचा विचार करता इंदिरा गांधींनंतर नरेंद्र मोदी पर्वाची देशात सुरुवात झाली आहे. मोदी यांच्या नावावरच अनेक राज्यांत भाजपने सत्ता मिळवली असली, तरी ज्या स्थानिक सभागृहात नेते, कार्यकर्ते घडतात, उदयास येतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मात्र भाजपला अद्याप जम बसविता आलेला नाही. सध्याची परस्थिती पाहता भाजपमध्ये अर्ध्याहून अधिक इतर पक्षीयांचा भरणा आहे. त्यामुळे एकनिष्ठ अन् उपरे असा अंतर्गत वाद सुरू आहे. यावर उपाय म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधूनच एकनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे. काँग्रेसचे दीर्घकालीन राजकारण या स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांच्या बळावरच सुरू होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून आमदारकी व खासदारकीची वाट प्रशस्त बनते. सहकारातून राजकीय समृद्धीची वाट बळकट होते. त्यामुळे लोकसभा, विधानसभा निवडणुकी इतकेच महत्त्व भाजपने आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना दिलेले दिसते. त्यातून भाजपने आपल्या या निवडणूक अभियानाला 'शंखनाद' असे नाव दिले आहे. दुसरीकडे मात्र विरोधक हे पावसामुळे, ओबीसी, मराठा आरक्षणामुळे या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडतात का ? यावर चर्चा करताना दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपला मराठवाड्यात म्हणावे तसे यश मिळाले नाही. पण विधानसभा निवडणुकीत भाजपने अभूतपूर्व यश मिळवले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपने मराठवाड्यातून वाजवला आहे. अपेक्षेप्रमाणे ऑपरेशन सिंदूरचे यश, सैन्याचा गौरव व चौथ्या क्रमांकावर पोहोचलेली भारतीय अर्थव्यवस्था म्हणजेच विकसित भारताचा शंखनाद या निवडणुकांच्या प्रचारातून ऐकण्यास मिळणार, हे निश्चित आहे. विरोधकांना मात्र या निवडणुकीत भाजप विरोधात शंखनाद करून चालणार नाही. राष्ट्रहित नजरे आड न करता त्यांना शेतकरी, कामगारांचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी व बेरोजगारी या प्रश्नांवर निवडणूक लढवावी लागेल. एकत्रित लढायचे की स्वतंत्र अथवा स्थानिक परिस्थिती पाहून निर्णय घ्यायचे यावर विरोधकांचे एकमत झाले पाहिजे. विधानसभा निवडणुकीतही भाजप व शिवसेना ठाकरे गटात उमेदवारीवरून मतभेद झाले. मात्र, त्यावर त्यांनी जाहीर वक्तव्य न करता पडद्याआड या प्रश्नांवर तोडगा काढला. एकाने मारायचे अन् दुसऱ्याने रडल्यासारखे करायचे, हा भाजपच्या निवडणुकीतील रणनीतीचा भाग बनला आहे. आता काही दिवसांत सर्वपक्षीयांमध्ये पक्षप्रवेशाचे सोहळे रंगतील. आयाराम-गयाराम यांचे सत्र सुरू होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षीय राजकारणापेक्षा स्थानिक राजकारणावरच विजयाचे यशापयश ठरते. या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमधूनच विकासाच्या नावावर एकत्र येऊन अनेक स्थानिक आघाड्या निर्माण हातील. निवडणुकी नंतर सत्तास्थापनेत या स्थानिक आघाड्यांना अव्हेरूनही चालणार नाही. काका-पुतणे, भाऊ-भाऊ एकत्र येवो अगर न येवो, स्थानिक कार्यकर्ते पक्षीय राजकारण बाजूला ठेवून एकत्र येऊ शकतात. कल्पनेपलीकडील आघाड्या, युती या निवडणुकांमधून निर्माण होऊ शकतात. कारण सध्याची राज्यातील राजकीय स्थिती पाहिली, तर विरोधी व सत्ताधारी पक्षात तीन-तीन पक्ष सहभागी आहेत. त्यामुळे कोणाला उमेदवार करायचे अन् कोणाला कार्यकर्ताच म्हणून राबवायचे याचा कस लागणार आहे. भाजपने या निवडणुकांचा 'शंखनाद' केलाच आहे.

त्यामुळे आगामी काळात राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. या निवडणुकांत भाजपला ऑपरेशन सिंदूर तारणार की मतदार, हे चार महिन्यांत स्पष्टच होईल.

# तब्बल १८ वर्षानंतर स्नेहसंमेलना निमित्त जमले पुन्हा एका वर्गात

बदनापुर (प्रतिनिधी) छत्रपती संभाजी विद्यालय वाकूळणी ता. बदनापूर येथील दहावीच्या २००५-०६ वर्गातील माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन साजरे केले, वास्तविक पाहता दहावीनंतर एकत्र येणे आपआपले सुखदुःख आपल्या बाल मित्रांना सांगणे यात खूप आनंद आहे, त्यावेळी दहावी वर्गातील विद्यार्थी रविशंकर कळमकर,सचिन दिवटे,मंगेश काळे,दीपक खाडे व अंजली हुसे यांच्या संकल्पनेतून एक व्हाट्सएप ग्रुप तयार करण्यात आला यातून दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम केले, शिक्षकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळालातब्बल १८वर्षांनी परस्परांना भेटताना सर्वांना आनंदाने भरून आले होते, सर्व विद्यार्थी जमा झाल्यानंतर सुरवातीला शिक्षकांचे फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले त्यानंतर दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, विद्यार्थ्यांनी परस्परांच्या कौटुंबिक व व्यावसायिक माहितीची देवाणघेवाण झाली,प्रास्ताविक मनीषा घाडगे व उषा पालवे यांनी केले, त्यानंतर विद्यार्थी व शिक्षक यांनी मनोगत व्यक्त केले बऱ्याच विद्यार्थ्यांना मनोगत व्यक्त करताना जुन्या काळातील आठवणींनी भरून आले होते,मनोगत व्यक्त केल्यानंतर वर्गातील मृत्यू झालेल्या विद्यार्थी व शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.शाळेच्या स्थापनेपासून प्रथमच एक कल्पक व नाविन्यपूर्ण उपक्रम या तुकडीने राबवला या उपक्रमाची दखल घेऊन इतर विद्यार्थ्यांनी विद्यालयात नवीन सोईसुविधा उपलब्धता होण्यास मदत होईल असे मत श्री खरात सर यांनी व्यक्त केले

कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य नलावडे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाकरे सर, ईश्वर बहुरे,



अण्णासाहेब पाटील उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ विठ्ठल शेळके, अनिरुद्ध खांडेभराड, सोपान लबडे, रामेश्वर काळे, कृष्णा लबडे, भगवान पालवे, सुदाम पुंड, सुदाम ढोबळे, रवि डोळे, राहुल मुंडे आदी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल हुसे यांनी केले. १८ वर्षांनी जमलेल्या माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी स्नेह मेळाव्या निमित्त एकत्र आले

# बीडच्या विद्यार्थ्यांची ऑलिंपियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी




बीड/प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत बीडच्या तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला. प्रमोद जी. महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या होलाम्बे अद्वैत सूरजने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र जिंकले. प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या गुजर अवधूत लिंब्रतनेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र मिळवले. परळी येथील माध्यमिक विद्यालयाच्या भेल आरुष चंद्रकांत कोहलीनेही आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवला आणि प्रमाणपत्रासह आंतरराष्ट्रीय कांस्य पदक मिळवले.

या वर्षीच्या एसओएफ ऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील सुमारे लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता ज्यात बीडमधील २५३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सहभागींमध्ये बीडमधील प्रमोद श्रजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, इंडो ब्रिटिश ग्लोबल स्कूल यासारख्या उल्लेखनीय शाळांचा समावेश होता.सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) ने दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे २०२४-२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या प्रसंगी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.के. माहेश्वरी म्हणाल्या की, आजच्या पिढीला ज्ञानाबरोबरच मूल्यांनी सक्षम करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनचे संस्थापक संचालक महाबीर सिंग म्हणाले की, २०२४-२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेत ७२ देशांमधील ४००० शहरांमधील ९६,४९९ हून अधिक शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि भिवानी हरियाणा येथील सीबीएलयूचे डीन डॉ.सतीश आर्य हे देखील कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.




## दु:ख समर्थपणे पेलवणार्या माता रमाईचा आदर्श प्रत्येक महिलेने घेण्याची आवश्यकता - अरुणाताई निसर्गन

बीड ।प्रतिनिधी

दी बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया बीड जिल्हा (पश्चिमच्या) विद्यमाने माता रमाई भिमराव आंबेडकर यांचा ९० वा स्मृतीदिन कार्यालय भारतीय बौध्द महासभा बसस्थानका जवळ बीड येथे दि.२७ मे २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस भगवान गौतम बुध्द आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच माता रमाईच्या प्रतिमेस अध्यक्ष अरुणाताई निसर्गन, माजी राष्ट्रीय संघटक व वरिष्ठ केंद्रीय शिक्षक व्ही.एन.निसर्गन गुरुजी, केंद्रीय शिक्षिका पद्मीनताई गायकवाड, कांताबाई जाधव, शोभाताई साळवी, संजीवनीताई गडगे यांच्या हस्ते माता रमाईच्या प्रतिमेस, पुष्पहार, धुपबत्ती प्रज्वलीत करुन सामुदायिक वंदना घेण्यात आली.

प्रास्ताविक आयु.बनसोडे यांनी केले तर माता रमाईच्या जीवन चरित्रावर पद्मीनताई गायकवाड, कांताताई जाधव, शोभाताई साळवी, संजीवनीताई गडगे, जिल्हाकोषाध्यक्ष, सुजाता वासनीक तसेच गौतम सोनवणे, सर्जेराव मस्के, होमगार्ड निवृत्त अधिकारी ठोकळ इत्यादींनी माता रमाईच्या जीवनावर आपले विचार मांडले. शेवटी माजी राष्ट्रीय संघटक व वरिष्ठ केंद्रीय शिक्षक व्ही.एन.निसर्गन गुरुजी यांचे मार्गदर्शनानंतर अध्यक्षीय समारोप अध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांनी केला.कार्यक्रमाचे आयोजन प्रा.बाळासाहेब शिंदे, राजेंद्र ससाणे, गौतम खेमाडे यांनी केले. महिला जिल्हा कोषाध्यक्षा सुजाताताई वासनीक यांच्या आभारप्रदर्शनानंतर सरणात्तयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा

बीड ।प्रतिनिधी



प्राथमिक पदवीधर शिक्षक अनिल संपत्ती जाधवर हे दि. ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दि. २९ मे रोजी करण्यात आले आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले.शिक्षक अनिल जाधवर यांचा सेवापूर्ती सोहळा हॉटेल नीलकमल येथे सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आला असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिक्षण अधिकारी भगवान फुलारी तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारीआदित्य जीवने, प्रकल्प अधिकारी संगीता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, अप्पर निबंधक राजेश जाधवर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, काँग्रेसचे दादा मुंडे, प्राचार्य डॉ. विक्रम सारूक, प्राचार्य खुशालराव मुंडे, प्रा.भाऊसाहेब सानप, उपलेखा वित्त अधिकारी संजय नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, शा.पो अधीक्षक रंगनाथ राऊत, गटशिक्षणाधिकारी समंदर खान सह आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी शिक्षण प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले.

## शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान

लातूर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या लातूर जिल्ह्यातील २२ शासकीय कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विभागस्तर आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त मंगेश शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### एकही आपत्तीग्रस्त मदतीपासून...

पालकमंत्री श्री. भोसले यांनी आज दूरध्वनीद्वारे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. जिल्हाधिकाऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसामुळे झालेले पीक नुकसान, पशुहानी आणि जीवितहानी याबाबत माहिती दिली.लातूर शहरातील रस्ते, सकल भागात पावसाचे पाणी साचल्याचे दिसून आले आहे. या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. तसेच शहरातील धोकादायक इमारतीबाबतही तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.वार्षिक सरासरीच्या जवळपास ३४ टक्के पाऊस मे महिन्यात झाला आहे. १४ ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे. यामध्ये २९ हेक्टरवरील जिरायत, २५ हेक्टरवरील बागायत आणि जवळपास ४६ हेक्टरवरील फळपिकांचे नुकसान झाले आहे. यासोबतच ५ व्यक्तींचा वीज पडून मृत्यू झाला आहे. तसेच १०२ जनावरे मृत्युमुखी पडले आहेत. जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

### नाद-स्वर-चैतन्य संगीत...

सादर केले, पुढे गात असतांना भक्ती यांनी कुहु कुहु बोले कोयलीया, रुणु-झुणु रुणु-झुणु रे भ्रमरा. सुरंजन यांनी - कानडा राजा पंढरीचा अभंग, का करू सजनी ही प्रचलित ठुमरी गाऊन श्रोत्यांची मनं जिंकली, पुढे कृपाळु सज्जन तुम्ही संत जन या भैरवीने अगदी आनंदी वातावरणात मैफिलीचा समारोप झाला.तबल्यावर साथ संगत संचालक नरहरी दळे, हरीष नखाते यांनी केली. संवादिनीवर साथ सांगत अमेय बेहरे यांनी केली. पुढे होणार्या संगीत मैफिलीचा आस्वाद घ्यावा असे श्रोत्यांना आवाहन नाद स्वर चैतन्य संगीत अकादमीचे संचालक नरहरी दळे यांनी केले आहे.

### माजी आमदार अमरसिंह....

आईच्या नावाने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी सोशल मिडीयाचे तालुकाध्यक्ष संदिप मडके आणि र.भ. अट्टल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दत्ताभाऊ पिसाळ यांच्या वतीने बुधवार दि. ३१ मे रोजी उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावे पाच हजार रुपये शिवशारदा मल्टीस्टेट, गेवराई येथे फिक्स डिपॉझिट करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ३० मे रात्री १२ वाजल्या पासुन ते शनिवार दि. ३१ मे रात्री १२ वाजेपर्यंत या कालावधीत जन्मलेल्या मुलींच्या आईच्या नावाने पाच हजार रुपयांची मुदत ठेव २० वर्षाच्या मुदती करता ठेवण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी हा उपक्रम राबविला असून हे तिसरे वर्ष आहे.

### आदित्य शिक्षण संस्थेतील...

भारताच्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.

## पान १ वरून...

आदिती सारडा यांच्या संकल्पनेतून दरवर्षी सोयाबीन, कांदा, राजमा बीजोत्पादन व अन्य भाजीपाला शेती विद्यार्थी, प्राध्यापक पिकवतात. त्यातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील सखोल माहिती मिळते.

कृषी पदवीधर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष शेती व त्यातही शास्त्रीय दृष्ट्या व्यवस्थापन करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर घरच्या शेतीत किंवा नोकरी व्यवसायात त्याचा चांगला उपयोग होतो. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, प्रा. श्याम भूतडा, प्रा. अमोल सानप, प्रा.जुबेर बागवान. प्रा ज्ञानेश्वर गव्हाणे. प्रा. सुधीर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी हा अनुभव दरवर्षी घेतात.

### पात्र शेतकऱ्यांना शंभर...

कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.


चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन

डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

सर्व कृषी सेवा केंद्र बाहेर शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर लावणार - विवेक जॉन्सन

या मागण्यांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपरोक्त विषयांवर जिल्हा प्रशासन तत्परपणे काम करेल असे आश्वासन दिले. त्याचबरोबर बोगस बियाणे आणि बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांना समस्या निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने टोल फ्री क्रमांक आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांना समस्या पोहोचतील याकरिता एक मोबाईल नंबर सर्व कृषी सेवा केंद्रांच्या बाहेर जाहीर रित्या लावण्यात येईल,डी.एल.सी.सी सभेमध्ये कर्ज वाटपाचा नियमित घेण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

# लाचखोर उपजिल्हाधिकाऱ्याच्या घरी धाड, ५० लाखांचं सोनं, मोठं घबाड





### खिरोळकरकडं काय काय सापडलं?

संभाजीनगर : लाचखोर अधिकाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारला जा असून छत्रपती संभाजीनगरच्या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना लाच घेताना एसीबी पथकाने अटक केली आहे. उपजिल्हाधिकाऱ्यांनी शेतजमिनीच्या कामासाठी तब्बल ४१ लाखांची मागणी केली होती. यापूर्वी या प्रकरणात २३ लाख रुपये त्यांची घरीही पोहोचले आहेत. मात्र, आणखी १८ लाख रुपयांची मागणी त्यांनी तक्रारदाराकडे केली होती. अखेर पाण्यासारखं पैसे मागणाऱ्या या लाचखोर अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. त्यानंतर, एसीबीच्या अधिकाऱ्यांना सापळा रचून लाचखोर विनोद खिरोळकरला अटक केली. त्यानंतर, त्याच्या घराची झाडाझडती घेतली असता मोठं घबाड पोलिसांना सापडलं आहे. त्यामध्ये, तब्बल ५० लाख रुपयांचे सोनं आहे. ५८९ ग्रॅम म्हणजेच ५९ तोळे सोनं एसीबीने जप्त केलं आहे.

लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज दुपारी धाड टाकून लाचखोर अधिकाऱ्याला अटक केली. तक्रारदाराकडे मागणी केलेल्या १८ पैकी ५ लाख रुपये घेताना एसीबीने निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकरला रंगेहात ताब्यात घेतले. या कारवाईने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. तक्रारदाराला वर्ग २ ची जमीन वर्ग १ करायची होती. आणि याच करिता निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. त्यांनी संबंधिताकडे सदरील काम करून देण्यासाठी ४१ लाख रुपये मागितले होते. त्यातील २३ लाख रुपये संबधित तक्रारदाराकडून आधीच घेतले होते. मात्र, तरीही १८ लाखांची पुन्हा मागणी करण्यात आली. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली. अव्वल कारकुन दिलीप त्रिभुवन मार्फत ही लाच घेण्यात येत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यासह, एसीबीने लाचखोर खिरोळकरच्या घरी धाड टाकून मोठा ऐवज आणि रोकड जप्त केली आहे.

# आष्टीतील महिलेचे साडेआठ लाखांचे दागिने एसटी बसमधून चोरीला



आष्टी (प्रतिनिधी)–

श्रीगोंदा येथे लग्न समारंभासाठी गेलेल्या आष्टीतील महिलेचे साडेआठ लाख रुपये किमतीचे दागिने एसटी बस प्रवासात चोरीला गेले. आष्टी परिसरातील शिदेवाडी येथील सुलोचना रखमाजी केरुळकर ही महिला त्यांच्या मावस बहिणीच्या मुलाच्या लग्नासाठी घोगरगाव (ता. श्रीगोंदा) येथे दि. २३ मे रोजी गेल्या होत्या. शनिवार दि. २४ मे रोजी विवाह समारंभ झाल्यानंतर याच गावातील त्यांच्या माहेरी भाऊ संतोष सूर्यभान बोरुडे यांच्या घरी त्या गेल्या. तेथे त्यांची मुलगीही पुण्याहून आली होती. यावेळी मुलीने तिचे दागिने आईकडे दिले.

एक दिवस भावाच्या घरी राहिल्यानंतर केरूळकर या रविवार दि. २५ रोजी घोगरगाव येथून अहिल्यानगरला जाण्यासाठी मंगळवेढा – अहिल्यानगर बसमध्ये बसल्या. भावाचा मुलगा त्यांना सोडण्यासाठी आला होता. यावेळी त्यांनी मुलीचे व स्वतःचे असे सुमारे १५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकत्र करुन बॅगमधील एका कप्प्यात ठेवले होते. घोगरगाव येथून अहिल्यानगर येथील चांदणी चौकात आल्यानंतर त्यांनी बॅग तपासून पाहिली व दागिने नसल्याचे लक्षात आले. याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर ८ लाख ४५ हजार २०० रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहेत. चोरीला गेलेल्या दागिन्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे – एक तोळा २ ग्रॅम वजनाचे सोन्याचा नेकलेस, चार तोळे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, पाच ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, चार तोळे १ ग्रॅम वजनाचा सोन्याचा टेम्पलचा गंठण (किंमत ४ लाख ५ हजार), दोन तोळे २ ग्रॅम वजनाचा सोन्याचा शाही हार (किंमत १ लाख ९४ हजार), एक तोळा २ ग्रॅम वजनाचा सोन्याचा चकोर आदी सोन्याचे एकूण ८ लाख ४५ हजार २०० रुपये किमतीचे दागिने चोरट्याने बस प्रवासात लांबविले.

# रिपाइंच्या वतीने दि.३० मे रोजी भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन – पप्पू कागदे

बीड ।प्रतिनिधी

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# तब्बल २१ वर्षांनंतर श्रृंगेरी विद्यालयातील २००४ च्या दहावीची विद्यार्थ्यांची शाळा भरली



आष्टी (प्रतिनिधी)–

सर्वांच्या आयुष्यात १० वीच्या वर्गाचा महत्वाचा टप्पा आहे. दहावीनंतर आवडीनुसार पुढच्या मार्गाची निवड करत असतो. असा हा टप्पा ओलांडून आज २१ वर्षे झाली, अर्थातच ते साल होते २००३ – २००४ शृंगेरी विद्यालय ब्रम्हगांव येथून दहावीची परीक्षा दिल्यानंतर बहुतांशी मित्र, मैत्रिणी वेगवेगळ्या मार्गांनी गेले. करिअरच्या मागे धावत असताना दोस्तांना भेटणं तर दूरच पण बोलणंही नव्हतं. पण व्हॉटसअँप आणि फेसबुकने मैत्रीचा पुर्नजन्म घडवला आणि सोमवार दि.२६ मे रोजी मोठ्या उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात माजी विद्यार्थांचे गेट टूगेदर कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रम अध्यक्षा मुख्याध्यापक सविता माने मॅडम होत्या. प्रमुख पाहुणे परमेश्वर पवार हे होते. यावेळी व्यासपीठावर कल्याण वाल्हेकर, भीमराव हराळ, अशोक डोके, सादिक पठाण, जगताप सर आदी उपस्थित होते. सन २००३ – २००४ मधील शृंगेरी विद्यालयातील विद्यार्थ्यांचा दि.२६ मे रोजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अतिशय उत्साहाच्या वातावरणात आयोजित करण्यात आला. तब्बल २१ वर्षांनी हे विद्यार्थी एकत्र आले. सकाळी १० वा शाळा भरण्याची बेल झाली. सर्व विद्यार्थी परिपाठासाठी रांगेत उभे राहिले. त्यावेळचे शारीरिक शिक्षक भिमराव हराळ सर यांनी परिपाठ घेतला. सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर सर्व विद्यार्थी रांगेत वर्गात बसले, त्यानंतर त्यावेळचे वर्गशिक्षक अशोक डोके सर यांनी हजेरी घेतली. विद्यार्थी त्यांच्या त्यावेळच्या जागेवर बसले होते. सर्व जण पुन्हा २१ वर्षे मागे गेले होते. हजेरी घेतल्यानंतर सर्व विद्यार्थी लाईन मध्ये कार्यक्रम स्थळी आले. शिक्षणाची देवता सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी आपला परीचय व आपण काय काम करतो याची माहिती दिली.

दुपारी जेवल्यावर एकमेकांच्या माहितींची देवाणघेवाण झाली. गप्पा सुरु झाल्या. आपलं लग्न, जोडीदार, ते निभावणं याबद्दल सगळ्यांनी आपापले विचार शेअर केले. प्रत्येकजण आपापल्या कहाण्या सांगण्यास उतावीळ झाले होते. बोलता बोलता थट्टा मस्करीही होत होती. सर्वांनीच शालेय जीवनातील गमतीजमती सांगितल्या. सर्वांना प्रत्येकाने दिलखुलास हसवलं, फोटो सेशनही झालं. कोणी लाजत – लाजत तर कोणी मनमोकळेपणानं व्यक्त झालं. या गेटटुगेदरला जे येऊ शकले नाहीत त्यांनी फोनवरून गप्पा मारल्या. अनेक क्षेत्रामध्ये विद्यार्थी उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्याबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. येणाऱ्यांशी संपर्क साधण्यापासून ते जेवण व्यवस्था, वाहतूक व्यवस्था इथपर्यंत झकास व्यवस्था केली होती. जेवणात ही उत्तम बेत झाला होता. हा कार्यक्रम मा. सरपंच विठ्ठल राख यांनी घडवून आणल्याबद्दल त्यांचे सर्व मित्रांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. सरपंच विठ्ठल राख, सुरेश पानसंडे, जनार्दन फुंदे, प्रकाश शिंदे, अतुल हराळ, डॉक्टर संदीप आंधळे, रमेश फुंदे, गणेश शिंदे, गौरव कुलकर्णी, नाजिम पठाण, शिवाजी शेकडे, ब्रह्मदेव राख, राजेंद्र शेकडे, शांतीलाल सानप, ज्ञानेश्वर शिंदे, संगीता राख, रेणुका निंबाळकर, लंका सानप, हौसा सानप, अनिता बडे, स्मिता हराळ, सुनिता फुंदे, आदींनी परिश्रम घेतले.

# नॅकच्या गुणवत्ता मूल्यांकनासाठी देवगिरी प्रतिष्ठानची दोन महाविद्यालये सज्ज

## २९ मे रोजी तुलसी फॅशन कॉलेजची नॅक परीक्षा तर आयटी कॉलेजची प्रक्रिया यशस्वी पूर्ण

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन आणि तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय ही दोन्ही महाविद्यालये राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद (नॅक) यांच्या गुणवत्ता मूल्यांकन प्रक्रियेस सामोरे जात आहेत. नॅकच्या दिशानिर्देशांनुसार सर्व दस्तऐवजीकरण आणि प्रस्तुतीकरणाची तयारी महाविद्यालयांनी पूर्ण केली आहे.तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे नॅक मूल्यांकन बुधवार, २९ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम यासाठी मागील काही महिन्यांपासून नियोजनबद्ध तयारी केली आहे. या मूल्यांकनासाठी सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात आली आहे.दरम्यान, तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयाचे मूल्यांकन नॅकच्या नॅक टीमने सोमवार, २६ मे रोजी दोन दिवसांच्या कालावधीत पूर्ण केले. या दरम्यान शैक्षणिक प्रक्रिया, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकास योजना तसेच संस्थेच्या सामाजिक जबाबदारीचे सविस्तर मूल्यमापन करण्यात आले असून ही प्रक्रिया महाविद्यालयाने यशस्वीरित्या पार पडली आहे.नॅकच्या अंतिम अहवालानंतर दोन्ही कॉलेजेसना त्यांचे ग्रेडिंग जाहीर केले जाणार आहे. हे ग्रेडिंग मिळाल्यानंतर देवगिरी प्रतिष्ठानच्या शैक्षणिक उत्कृष्टतेला निश्चितच अधिक चालना मिळणार आहे.

# शिवप्रकाश स्वामी यांचे निधन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) –



केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथील लोकमत चे एजंट व वार्ताहर शिवप्रकाश लिंगमुर्ती स्वामी (वय- ६८) यांचे मंगळवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मंगळवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

## उज्जोत प्रिमियर लीग – २०२५ चे अंबाजोगाईत आयोजन

# नवकेशर सुपर किंगची विजयी सलामी ; सचिन उपाडे ठरले 'मॅन ऑफ द मॅच'



अंबाजोगाई (प्रतिनिधी) –

येथील उज्जोत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उज्जोत प्रिमियर लीग – २०२५' चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. सुरूवातीच्या सामन्यात नवकेशर सुपर किंगने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सामना जिंकला. तर आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावा काढल्या. या सामन्यात नवकेशर सुपर किंगचे गोलंदाज सचिन उपाडे हे ३ षटकांत (ओव्हर) मध्ये ११ धावा देत आणि २ विकेट घेत 'मॅन ऑफ द मॅच' ठरले. उज्जोत प्रिमियर लीगला क्रिकेट प्रेमींचा भरभरून प्रतिसाद लाभत आहे.

अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य राजमाता जिजाऊ मैदानावर उज्जोत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उज्जोत प्रिमियर लीग – २०२५' चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा रविवार, दिनांक २५ मे २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. 'उज्जोत प्रिमियर लीग – २०२५' मध्ये नवकेशर सुपर किंग, अजिंक्य सिसी, आर.आर.पॉलिटेक्निक, द लिगल ईगल, आयडियल क्रिकेट क्लब आणि विराट वायपर्स या सहा संघांनी सहभाग घेतला आहे. हे सामने सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत या वेळेत लेदर बॉलवर खेळवले जात आहेत. या सामन्यांचे पंच (अंपायर) म्हणून संघर्ष इंगळे आणि अशोक खाडे यांनी काम पाहिले. तर सामन्याचे बहारदार समालोचन (कॉमेंट्री) ज्योतिराम परळकर यांनी केले. नवकेशर सुपर किंग आणि आर.आर.पॉलिटेक्निक या दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या सुरूवातीच्या सामन्यात आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावांचे लक्ष नवकेशर समोर ठेवले होते. नवकेशर सुपर किंग संघाने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) ८७ धावा काढून हे आव्हान लिलया पेलत अखेर विजयाची बाजी मारली. या सामन्यात नवकेशर सुपर किंग संघाचे प्रमुख भिमाशंकर शिंदे, कर्णधार धम्मानंद वैद्य, अष्टपैलू खेळाडू डॉ.राजेश इंगोले, प्रा.अनंत कांबळे, विक्रमसेन आगळे, प्रदीप जाधवर, सचिन उपाडे, दर्शन पठाडे, दुर्वांक रघू, नवाजीस अली, ऋषिकेश काटुळे, आज्जू खान, अद्वैत देशपांडे, चेतन माने, आदि शिंदे आणि यश खरात या खेळाडूंनी दिमाखदार कामगिरी करीत 'उज्जोत प्रिमियर लीग – २०२५' मध्ये विजयी सुरूवात केली आहे. आर.आर.पॉलिटेक्निक संघाने नवकेशर सुपर किंग संघाला १५ षटकांत (ओव्हर) विजयासाठी ८४ धावांचे लक्ष दिले. परंतु, नवकेशर सुपर किंगने २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सहज विजय मिळवला. हा रोमहर्षक सामना पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींनी मैदानावर मोठी गर्दी केली होती. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या राजमाता जिजाऊ मैदानात सुरू असलेल्या या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात सुरू आहेत.



# जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला जनतेनेच बसवले घरी

## काडीवडगाव सरपंचावर ३४९ विरुध्द २ मताने ठराव जनमतातुन मंजुर

वडवणी (प्रतिनिधी)–

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील सरपंच सौ. प्रभावती लक्ष्मण हतागळे यांच्या कामात अनियमीतता आसल्याने त्यांच्या विरुध्द जनतेतुन अविश्वास ठराव घेण्यासाठी विशेष ग्राम सभेचे आयोजन वडवणी पंचायत समीती गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षते खाली मंगळवार दि २७ मे रोजी आयोजन करण्यात आले होते.यामध्ये ३४९ विरुद्ध २ आसा ठराव जनमतातुन पारीत झाल्याने जनतेने निवडून दिलेल्या सरपंचाला जनतेनेच घरी बसवल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.

सविस्तर वृत्त आसे की तालुक्यातील काडीवडगाव येथील सरपंच पदासाठी जनतेतून निवडून आलेल्या सरपंच सौ प्रभावती लक्ष्मण हतागळे यांच्या कामामध्ये अनियमितता गावातील नागरिकांचे वेळेवर काम न करणे विकास कामाची आडवणूक करणे अदी कारणास्तव गावातील नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच अपात्रतेसाठी ३० एप्रिल २०२५ रोजी ८ विरुद्ध १ असा ठराव वडवणी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्त करून पारीत झाला. जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षखाली मंगळवार दि २७ मे रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये एकूण ३६५ मतदारांनी सहभाग घेतला होता. यापैकी ३४९ मतदारांनी सरपंचाच्या विरोधात तर दोन मतदारांनी सरपंचाच्या बाजूने व १४ मतदारांनी तटस्थ भूमिका घेतल्याने सरपंच प्रभावती लक्ष्मण हातागळे यांच्या अविरोधाचा ठराव मंजूर झाला. यावेळी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सहाय्यक गट विकास अधिकारी एस ए पोहनेरकर, विस्तार अधिकारी अशोक निर्डे, शेख रफीक, अशोक हजारे दीपक जोगदंड सचिव गोवर्धन गिरी यांच्यासह पोलीस कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये ग्रामस्थांची ग्रामपंचायत मधुन होणाऱ्या कामात मोठ्या प्रमाणात आडवणुक केली जात होती.कामामध्ये अनिमीतता, विकास कामात अडथळा यामुळे नागरिकांची कामे होत नसल्याने हा ठराव घेण्यात आला.

गोविंद बादाडे ( उ.सरपंच काडीवडगाव )

# सिने अभिनेते रितेश देशमुख व राजकिशोर मोदी यांच्या भेटीत विविध विषयांवर चर्चा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)–

मराठवाड्याचे सुपुत्र सुप्रसिद्ध सिने अभिनेते रितेश देशमुख तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांची बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या कौटुंबिक भेटीत उभयतांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. राजकिशोर मोदी हे लोकनेते स्व विलासराव देशमुख यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांची भेट विलासराव देशमुख यांचे सुपुत्र सिने अभिनेते रितेश देशमुख यांच्याशी भेट झाली. या भेटी दरम्यान त्यांच्यात राजकीय, सामाजिक तसच सांस्कृतिक विषयावर सांगोपांग चर्चा झाली.

रितेश देशमुख यांच्या येऊ घातलेला छत्रपती शिवाजी या चित्रपटा विषयी माहिती देतांना रितेश देशमुख यांनी सांगितले की हा चित्रपट जवळपास सहा भाषांमध्ये येणार असून त्याचे स्वरूप हे भव्यदिव्य अशा स्वरूपात असणार आहे. महाराष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेमध्ये रितेश देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, जीनिलिया देशमुख, महेश मांजरेकर,



सचिन खेडकर हे प्रमुख भूमिकेत असल्याचे रितेश देशमुख यांनी सांगितले. सदरील चित्रपट मराठी, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम या सहा भाषेत हा प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल राजकिशोर मोदी यांनी रितेश देशमुख आणि त्यांच्या संपूर्ण टीमला (मुंबई फिल्म कंपनी) मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर स्व.विलासरावजी देशमुख यांचे अंबाजोगाई करांविषयीचे नाते याविषयी अतिशय दिलखुलास पणे चर्चा झाली. रितेश देशमुख यांनी देखील संपूर्ण अंबाजोगाई वासीयांचे आस्थेवाईकपणे चौकशी केली. त्यासोबतच त्यांनी अंबाजोगाईकरांची अतिशय जिव्हाळ्याची अशी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक तथा बँकेच्या व्यवहाराबद्दल, तसेच मोदी लर्निंग सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध शैक्षणिक संस्थाबद्दल देखील आपुलकीने चौकशी केली. यादरम्यान अभिनेते रितेश देशमुख यांना अंबाजोगाई शहरात येण्याचे निमंत्रण राजकिशोर मोदी यांनी दिले असतांना रितेश यांनी शूटिंग नसल्यास अथवा पूर्वनियोजित काही कार्यक्रम नसल्यास अंबाजोगाईला नक्की येईन

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजशक्ती
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )
मराठवाडा वृत्त
बुधवार,दि.२८ मे २०२५
WEDNESDAY, DT.28 MAY 2025


# भविष्यात सुखाच्या दिवसांसाठी विद्यार्थ्यांनी भरपूर कष्ट करावेत - मा.आ. भीमराव धोंडे

## वॉटरप्रुफ मंडप असल्याने भर पावसात कार्यक्रम सुरू

आष्टी (प्रतिनिधी)-

दिवसेंदिवस आपल्या शाळांची गुणवत्ता वाढत चालली आहे. विद्यार्थ्यांनी आतापासून पुढच्या शिक्षणाची चांगली तयारी करावी. आपल्याला काय व्हायचे ते आत्ताच ठरवावे. खेळाकडे लक्ष द्यावे. खेळामुळे देखील नोकरीत भरपुर संधी आहेत. सकाळी उठून अभ्यास करावा तसेच व्यायाम करावा. जिवनात सुखाचे दिवस पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगले कष्ट करावे, मन लावुन अभ्यास करावा. भावी जीवनात चांगले काम करावे. मुख्याध्यापकांनी गुणवत्ता व निकाल वाढविण्यासाठी प्रयत्न करावा असे प्रतिपादन संस्थाअध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे केले.

आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमासाठी वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला होता. त्यामुळे मंगळवारी दिवसभर पाऊस सुरू असुन देखील भर पावसात गुणवंत सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.शेतकरी शिक्षण संस्था, आनंद चॅरिटेबल संस्था, छत्रपती शाहु एज्युकेशन सोसायटी व किसान शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महेमुद पटेल आणि कार्यालयीन कर्मचारी तथा पत्रकार दिगंबर बोडखे यांच्या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, शेतकरी शिक्षण शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन राजेश धोंडे, ह. भ. प. पांडुरंग महाराज कर्डीले, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख, डॉ. चंद्रकांत गोसावी, सरपंच चंदनशिव, सेवानिवृत्त सैनिक हांगे, उपसंपादक उत्तम बोडखे, प्राचार्य डॉ. बापुराव धोंडे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, ठकाराम दुधावडे, दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी चांगली गुणवत्ता प्राप्त करुन जिवनात नावलौकिक करावे तसेच आई - वडील, आपले गाव आणि संस्थेचे नांव मोठे करावे. दहावी परिक्षेत शंभर टक्के गुण मिळविणारे अनेक विद्यार्थी आहेत. ते खरोखरच कौतुकास पात्र आहेत तसेच अनेक शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे.ज्यांचे निकाल कमी आहेत अशा मुख्याध्यापकांनी पुढील वर्षी विद्यार्थ्यांकडून चांगला अभ्यास करून घ्यावा व आपणही शंभर टक्के निकाल लावुन गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावा, गुणवंत विद्यार्थी कोठेही गेला तरी त्याने बौद्धिक दृष्टीने आपले नाव काढले पाहिजे. चांगल्या शैक्षणिक गुणवत्तेबद्दल आष्टी येथील पंडीत नेहरु विद्यालयाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कौतुक केले. आपापल्या शाळेची गुणवत्ता वाढविल्यास विद्यार्थी आपोआप वाढतील, पालक तुमच्याकडे प्रवेशासाठी चकरा मारतील. विद्यार्थ्यांसाठी संस्था अनेक उपक्रम राबविते. लवकरच कडा किंवा आष्टी येथे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला कमी वयात पहिल्यांदा विधानसभेत पाठविले होते, त्यामुळे मी त्यांच्या पाल्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षणासाठी शेवटपर्यंत काम करीत राहणार आहे. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेतकरी शिक्षण संस्था सुरू केली आहे. विद्यार्थ्यांनी मार्क कमी पडले तरी नाराज होऊ नका, पुन्हा जिद्दीने अभ्यासाला लागा आणि पुढील परिक्षेत चांगले गुण मिळवून जिवनात यशस्वी व्हा. भविष्यात काय बनायचे ते आताच ठरवा, कष्ट करणाऱ्याला यश मिळते. विद्यार्थ्यांनी वर्षभर आणि परिक्षा काळात वेळापत्रकानुसार अभ्यास कसा करावा, दिवस किती शिल्लक राहिले आहेत. विषय नियोजन कसे करावे याची सविस्तर माहिती माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितली. आजच्या गुणवंतांनी पुढील पाच सहा वर्षांनी मी असा अधिकारी बनलो आहे किंवा या क्षेत्रात कार्यरत आहे हे पेढे वाटून आम्हाला सांगावे म्हणजे आम्हालाही खरोखरच आनंद होईल. यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सेवानिवृत्ती बद्दल प्रा. डॉ. महेमुद पटेल व पत्रकार दिगंबर बोडखे यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, महाविद्यालयात सर्व प्रकारच्या शिक्षण सुविधा उपलब्ध आहेत. करिअर कट्टा, विविध ठिकाणी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र, विद्यापीठाचे पेपर तपासणी केंद्र. ४० वर्षांपुर्वी तालुक्यात मोजक्या शाळा होत्या. परंतु मा. आमदार भीमराव धोंडे यांनी पहिल्यांदा विधानसभा सदस्य झाल्यानंतर मतदारसंघातील अनेक गावांमध्ये शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये सुरु करुन शिक्षणाची सोय केलेली आहे.



## पोखरी रस्त्याची दयनीय अवस्था; ग्रामसडक योजनेअंतर्गत येणाऱ्या रस्त्याची त्वरित दुरुस्तीची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)-

अंबाजोगाई ते पोखरी दरम्यानचा तसेच लातूर महामार्गाला जोडणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. या रस्त्यावर असलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे स्थानिक नागरिकांना, शाळा-कोलेजातील विद्यार्थी, रुग्ण, तसेच इतर प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत येतो, मात्र प्रशासनाने या रस्त्याकडे अजूनही दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पोखरी परिसरातील नागरिक व आजूबाजूच्या गावांतील प्रवासी दररोज या रस्त्याचा वापर करतात. अंबाजोगाईच्या एस.आर.टी. रुग्णालयात रुग्णांना ने-आण करण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. ऑटो रिक्षा, दुचाकी व अन्य खासगी वाहने याच मार्गाने ये-जा करत असताना त्यांना अनेक वेळा खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका निर्माण होतो.जिल्हा परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की, रस्त्यावरील खड्डे हे अक्षरशः मृत्यूच्या सापळ्यासारखे वाटतात. विशेषतः रात्रीच्या वेळेस, रुग्णालयात जाणाऱ्या गरोदर महिलांना किंवा आपत्कालीन रुग्णांना या रस्त्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. अनेक महाविद्यालयीन विद्यार्थिनी, शेतकरी, किरकोळ व्यापारी आणि सामान्य नागरिक याच मार्गाने प्रवास करतात. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये रोष निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत आहे की, हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावा. नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने त्वरित लक्ष घालून रस्ता व्यवस्थित करावा. जनतेकडून केवळ एवढीच अपेक्षा आहे की, त्यांचा प्रवास सुरक्षित आणि सुलभ व्हावा.

पत्रकार संजय सुर्यवंशी शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देणारे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कार्यवाही करण्याची

# मराठी पत्रकार परिषद हल्ला विरोधी कृती समितीची निवेदनाद्धारे मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणारे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कार्यवाही करण्याची याची मागणी मराठी पत्रकार परिषद मुबंई, सलग्न हल्ला विरोधी कृती समिती च्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील देशोन्नतीचे पत्रकार व मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष संजय सूर्यवंशी यांनी दिनांक २२ मे २०२५ रोजी निवधा तळणी सर्कल मधील २५ गावे २५ तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले. वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुध्दा कोणाच्यातरी चुकीच्या व्यक्तीच्या गैरसमज करून देण्याच्या



प्रकारातून दि. २२/०५/२०२५ रोजी आ बाबुराव कदम यांनी सकाळी ९.२५ वाजता ९८२२२१०००३ या नंबर वरून ७ वेळा तर रात्री ०८:४४ वा. ९४२०४१५९२१ या नंबर वरून भडव्या, हरामखोरा, मादरचौद चुकीच्या बातम्या छापतोस का असे म्हणत संज्या तुला संपुन टाकेल अशा आर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली.

लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ असलेल्या पत्रकारास जिवे मारण्याची धमकी देवून संपवण्याची भाषा करणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्यमंत्री विश्वस्त मा एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली मराठी पत्रकार परिषद मुबंई सलग्न हल्ला विरोधी कृती समिती अंबाजोगाईच्या पुढाकाराने अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन यांना देण्यात आलेल्या निवेदना द्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर दत्तात्रय अंबेकर (जिल्हा निमंत्रक, हल्ला विरोधी कृती समिती), गजानन मुडेगावकर (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद), अशोक दळवे (तालुका निमंत्रक हल्ला विरोधी कृती समिती), प्रशांत लाटकर (तालुका अध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद) (डिजिटल मीडिया परिषदेचे उपाध्यक्ष संजय जोगदंड),यांच्या सह जेष्ठ मार्गदर्शक विरेंद्र गुप्ता, सचिव ज्ञानेश मातेकर, कार्याध्यक्ष पूनमचंद परदेशी, उपाध्यक्ष मारोती जोगदंड, संजय रानभरे, गोविंद खरटमोल, सलीम गवळी, नागनाथ वारद, व्यंकटेश जोशी, वसुदेव शिंदे, गोविंद जाधव, परमेश्वर वैद्य, गणेश चांगिरे, शेख फिरोज, अशोक कोळी, वाजेद शेख आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अर्धवट पुलांच्या कामामुळे वाहनचालकांना त्रास

## शिरूर तालुक्यातील पुलांची कामे रखडली



मानूर (प्रतिनिधी)-

चिंचपूर ते नवगणराजुरी महामार्गावरील पुलांची कामे रखडल्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे.गत आठ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शिरूर तालुक्यातील ओढ्यांना मोठ्या प्रमाणात पाणी आल्यामुळे कापरी नदीवरील भराव शनिवारी वाहून गेला होता.त्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागला होता.तर मानूर येथील पुलाच्या मार्गावर मंगळवारी सुरू असलेल्या संततधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर चिखल तयार झाल्यामुळे गाड्या फसण्याचे प्रकार घडले.राज्य मार्गाचे काम अगोदरच कासवगतीने चालू असल्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असताना पुलांची कामे देखील संथगतीने सुरू असल्यामुळे प्रवाशांसह नागरिकांना हाकनाक त्रास सहन करण्याची वेळ आली आहे.पावसाळ्याच्या तोंडावर तरी किमान संबंधित गुत्तेदाराने आणि यंत्रणेने पुलांची कामे जलदगतीने करणे गरजेचे

बीड शहरात रिपाईच्या वतीने ३० मे रोजी

# भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन - अशोक (भाऊ) साळवे

आष्टी (प्रतिनिधी)-

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्धवस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले.

भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाईच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे.

भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.



बीड शहरात जिल्हा रिपाईच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाई पदाधिकारी यांच्यासह रिपाई व युवक रिपाई च्या आष्टी तालुक्यातील कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी असे आवाहन मा. सभापती, पं. स. आष्टी तथा रिपाई (आठवले गट) आष्टी तालुकाध्यक्ष अशोक (भाऊ) साळवे यांनी केले आहे.

# हिंदूंना संघटित करून राष्ट्र परम वैंभवशाली करणे हेच संघाचे उद्दिष्ट - शरदराव ढोले

## देवगिरी प्रांताचा संघ शिक्षा वर्गाचा समारोप संपन्न

शिरपूर (प्रतिनिधी)-

राष्ट्रीय स्वयंसेवक संघा ला स्वत:साठी काही करायचे नाही.संघाचा कोणी स्पर्धक नाही व संघ कोणाशी स्पर्धा करत नाही.संघाला चारित्र्यवान हिंदू समाजाच्या बळावर राष्ट्र अजिंक्य व परम वैभवशाली करायचे आहे,असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे अखिल भारतीय धर्मजागरण प्रमुख शरदराव ढोले यांनी केले.ते शिरपूर येथे रा.स्व.संघाच्या संघ शिक्षा वर्गाचा समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून मा.आप.श्री जितेंद्र चंद्रसेन पाडवी (आप की जय संप्रदायाचे प्रमुख मठाधिपती, नंदुरबार),देवगिरी प्रांत संघचालक मा.अनिल भालेराव,व्यावसायिक यांच्या वर्गाचे सर्वाधिकारी बाळासाहेब चव्हाण (छत्रपती संभाजीनगर विभाग संघचालक), महाविद्यालयीन गटाच्या वर्गाचे सर्वाधिकारी ड.रवींद्र कदम (धाराशिव जिल्हा संघचालक),शिरपूर तालुका संघचालक सुनील गोलाने यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद बाकलीकर यांनी केले. के.व्ही.टी.आर.सी.बी.एस.सी.स्कुल मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.



या वर्गामध्ये देवगिरी प्रांतातील म्हणजेच मराठवाडा व कान्हदेश या विभागातील ११ शासकीय जिल्ह्यातील १५५ गावातील १५७ इतक्या शिक्षार्थींनी सहभाग घेतला. संघाच्या २५३ कार्यकर्त्यांनी वर्ग यशस्वी होण्यासाठी पूर्णवेळ सहभाग घेतला.यामध्ये विद्यार्थी, शिक्षक,शेतकरी,मजूर, नोकरदार,व्यवसायी असे विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.या वर्गामध्ये शिक्षार्थी स्वयंसेवकांना शाखा संचालन,व्यायाम योग,दंड प्रहार,नियुद्ध, विविध खेळ यांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच दररोज विविध सत्रामधून ग्रामविकास, व्यक्तिमत्त्व विकास, पर्यावरण रक्षण,गोसेवा, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, हिंदुत्व,स्वदेशी व सेवाभाव अश्या विविध विषयांचे बौद्धिक मार्गदर्शन सुद्धा देण्यात आले.मोबाईल जवळ न बाळगता १५ दिवस सर्व शिक्षार्थींनी कठोर साधना केली.वर्गासाठी दोन्ही वेळ शिरपूर शहर व तालुक्यातून पोळी संकलन करण्यातआले. याची पूर्ण जबाबदारी मातृशक्ती महिला कार्यकर्त्यांनी पाहिली. यासाठी एका वेळी ८० घरांमधुन ८००पोळ्यांचे संकलन करण्यात येत असे. संपुर्ण वर्ग कालावधीत एकुण २८८० घरांमधुन २८८०० पोळ्यांचे संकलन करण्यात आले.वर्गात पूर्ण पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त व्यवस्था केली होती.वर्ग सुरू असताना लोक प्रतिनिधी, शासकीय अधिकारी,नागरिक, सज्जनवृंद व संतांनी भेटी दिल्या.

शरदराव ढोले यांनी समारोप प्रसंगी उपस्थितांना उद्बोधित केले.ते म्हणाले संघाला स्वत:साठी काही करायचे नाही.डॉ. हेडगेवार यांनी गौरवशाली हिंदू समाज व शक्तिशाली हिंदुराष्ट्रा चे स्वप्न पाहिले होते. त्यासाठीच संघाचे कार्य सुरू झाले.गेल्या शंभर वर्षापासून स्वयंसेवक तेच परम वैभवशाली राष्ट्र निर्मितीसाठी कार्य करत आहे.चारित्र्यवान हिंदू समाजाच्या आधारावर अजिंक्य राष्ट्र संघाला निर्माण करायचे आहे.आजचा काळ संघाला अनुकूल असल्यामुळे अधिक साधना करावी लागणार आहे.ज्या क्षेत्रातसंघाचा कार्यकर्ता काम करतोय तिथे परिवर्तन घडत आहे,त्याचे उदाहरण ऑपरेशन सिंदूर मधून दिसत आहे असे ते म्हणाले.

संघामुळे जनजाती वीरांचा इतिहास समोर येत आहे - आप जितेंद्र महाराज पाडवी

नंदुरबार येथील आप संप्रदायाचे प्रमुख मठाधिपती जितेंद्र महाराज यांनी आपल्या मनोगतामध्ये संघ कार्याचे कौतुक केले.ते म्हणाले की,संघाच्या कार्यामुळे आदिवासी वीरांचा इतिहास पुढे येत आहे.देशात संघाचे काम चांगले होत आहे. संघ इतिहास घडवण्याचे काम करत आहे.आमचे पूर्वज गुलाम महाराजांनी देश व धर्मासाठी बलिदान दिले.आदिवासी समाजाला धर्मांतरा पासून रोखण्यासाठी त्यांनी आरती सुरू केली होती.त्या आरती साठी त्याकाळी सव्वा लाख भाविक आल्याची नोंद आहे असे ते म्हणाले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व करिअर मार्गदर्शनाचा मेळावा थाटात संपन्न

## सरस्वती अकॅडमी व अक्षय कॉम्प्युटर्स पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य कार्यक्रम



पाथरी ।प्रतिनिधी

सरस्वती अकॅडमी व अक्षय कॉम्प्युटर्स, पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी सत्कार व करिअर मार्गदर्शन समारंभ मंगळवार, दि. २७ मे २०२५ रोजी सकाळी ९ वाजता बालाजी मंदिर, ओंकार नगर, पाथरी येथे अत्यंत प्रेरणादायी व उत्साही वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास पाथरी परिसरातील अनेक मान्यवर, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण व आरोग्य सभापती दादासाहेब काका टेंगसे हे ऊपस्थीत होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा.अनिल उजगरे सर, अपेक्ष अकॅडमी पाथरी हे ऊपस्थित होते. तसेच प्रमुख पाहूणे म्हणुन प्रा.लक्ष्मणराव घुंबरे ,प्रा. कृष्णाजी टेंगसे ,प्रा.प्रल्हादराव शिंदे ,प्राअर्जुन रनेर ,प्रा .छत्रगुण नखाते ,प्रा.रविराज फुलवरे ,आदी मान्यवर ऊपस्थीत होते .आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना यशाचे मार्ग सांगत आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा सल्ला दिला.कार्यक्रमात यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हा कार्यक्रम मोलाचा ठरला.या कार्यक्रमात प्रा.लक्ष्मणराव घुंबरे,प्रा.कृष्णाजी टेंगसे,प्रा प्रल्हादराव शिंदे ,प्रा.अर्जुण रनेर ,प्रा.छत्रगुण नखाते ,प्रा.रविराज फुलवरे आदी या तज्ज्ञांनी विविध विषयांवर - स्पर्धा परीक्षा, करिअर निवड, डिजिटल शिक्षण, व्यवसायिक संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम पौळ यांनी केले तर सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.संदीप टेंगसे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. संदीप टेंगसे, सौ. कोमल टेंगसे, श्री. तुकाराम पौळ सर व सौ. शिवकन्या पौळ यांच्या वतीने करण्यात आले. या उपक्रमामुळे पाथरी तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा संचारली असून, भविष्यात असेच प्रेरणादायी कार्यक्रम घडावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




भारतीय जनता पार्टी, महानगर परभणी कडून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमीत्त राज्यमंत्री तथा पालकमंत्री मा.ना.सौ. मेघना दीदी साकोरे बोर्डीकर व महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडोबा मंदिर मंडळात वक्तृत्व व निबंध स्पर्धा घेण्यात आली व नंतर बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक वेद झांबरे, द्वितीय रितिका आंभोरे, तृतीय इशू खुणे, व तसेच निबंध स्पर्धामध्ये प्रथम सई देशमुख, द्वितीय पृथ्वी देशमुख, तृतीय प्रतीक्षा शेळके यांना मिळाले प्रोत्साहनपर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. यावेळी भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, रमाताई शेजावळे, भालचंद्रजी गोरे, स्वप्नीलजी पिंगळकर, सुरज चोपडे पाटील, गोविंदजी रायमले, नरेशजी लंगोटे, ऋषिकेश लंगोटे, सुशांत साखरे, सचिन साखरे, रुपेश कलंदर यांच्यासह प्रभागातील सर्व ज्येष्ठ नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा फोकसने उजळला : वाकोडकर मित्र मंडळाद्वारे स्तुत्य उपक्रम



परभणी (प्रतिनिधी)

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळ्यासह संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळावा या हेतूने महापालिका प्रशासनाकडे सातत्याने आग्रह केलेल्या येथील अभिषेक वाकोडकर मित्रमंडळाने अखेर अभिषेक वाकोडकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार २६ मे रोजी पुतळ्यासह परिसरात २५० व्हॅटचे ८ फोकस बसवून पूर्णाकृती पुतळ्यासह संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळविला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह परिसराचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतरसुध्दा तो पूर्णाकृती पुतळा व परिसर रात्रीच्या वेळी पूरेशा दिव्यांअभावी अंधारात होता. त्या पार्श्वभूमीवर अभिषेक वाकोडकर मित्रमंडळाने महापालिका प्रशासनास एकदा नव्हे दोनदा निवेदने देवून या पूर्णाकृती पुतळ्यासह परिसर हा रात्रीच्यावेळी लखलखत्या दिव्यांनी उजळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली, त्यासाठी सातत्याने आग्रह केला. परंतु, प्रशासनाने त्याकडे कानाडोळा केला. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाचे सरचिटणीस अभिषेक वाकोडकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वाकोडकर मित्रमंडळाने सोमवारी या पुतळा परिसरात २५० व्हॅटचे ८ फोकस पूर्णाकृती पुतळ्यासह परिसरात बसवून तो संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळविला.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे नेते डॉ. केदार खटींग, सामाजिक कार्यकर्ते रितेश जैन, संभाजी ब्रिगेडचे बालाजीराव मोहिते, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शंकरराव देशमुख, विधानसभा विस्तारक रामदास पवार, युवा मोर्चाचे महानगर जिल्हाध्यक्ष अक्षय डहाळे, मधुसूदन वाकोडकर, अमोल वाकळे, माऊली कोपरे, रोहित उक्कडगावकर, अनिल रेंगे, इशान देशपांडे, योगेश खेत्री, स्वप्नील जोशी, मधुर चक्रवार, मुरली शेळके, अभिषेक वाकोडकर आदी उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांना कार्यक्रमाच्या प्रारंभी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. मान्यवरांनी अभिषेक वाकोडकर मित्रमंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन केले.

शंकरनगरच्या अंगणवाडीत डिजिटल पाट्या वितरित...

वसमत रस्त्यावरील प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत शंकर नगरातील महानगरपालिकेच्या अंगणवाडीतील चिमूकल्यांना अभिषेक वाकोडकर मित्र मंडळाच्या वतीने वाढदिवसाचे औचित्य साधून डिजिटल स्लेट (पाट्या) वितरित करण्यात आल्या. यावेळी अमोल वाकळे, विठ्ठल राऊत, रोहित उक्कडगांवकर, विक्की हनवते, सुमीत घनसावंत, प्रताप घाटूळ, पवन आगलावे, सुमित जल्हारे, आकाश जल्हारे, गोविंद जोशी, शशांक चंदेल, योगेश खेत्री, अभिषेक वाकोडकर, मधुसुदन वाकोडकर, मुरली शेळके आदी उपस्थित होते.

# अनुकंपाग्रस्त कुटुंबावर कुऱ्हाड अशा गरुड यांचा प्रताप



परभणी ।प्रतिनिधी

गंगाखेड तालुक्यातील राजाभ्रहतरी विद्यालय हरंगुळ येथील शाळेतील लिपिक प्रकाश कुलकर्णी यांचे २०१६ कॅन्सर आजाराने निधन झाले. त्यामुळे रिक्त जागेवर शासन निर्णय अनुकंपा जीआर नुसार व वारसदार किरण कुलकर्णी यांनी नोकरीत सेवेत घेण्याची मागणी मुख्याध्यापक संस्था अध्यक्ष आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली. परंतु संस्थेने बे दखल करत नियमबाह्य पद्धतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी अशा सर्व मुख्याध्यापकाच्या मुलाचा प्रस्तावल शिक्षणाधिकारी अशा गरुड यांनी मान्यता देऊन. अनुकंपाग्रस्त कुटुंबावर कुऱ्हाड फिरवून रस्त्यावर आणले आणि मोठा अन्याय केला. त्यामुळे अन्यायग्रस्त किरण कुलकर्णी यांचे कुटुंब न्यायासाठी भटकंती करत आहे.

परभणी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागात अशा गरुड यांनी अंदाधुंदी करत हजारो नियमबाह्य कामे केलेली आहे. आपलं कोणी काही करू शकत नाही या उदमत प्रकाराने हजारो नियमबाह्य काम केले. त्यात कळसच झाला मयत प्रकाश कुलकर्णी यांचा वारस किरण कुलकर्णी यांनी सन २०१७ पासून माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे अर्जाद्वारे रिक्त जागेवर मलाच मान्यता द्यावी अन्य कोणालाही देण्यात येऊ नये असे असतानाही अनुकंपाग्रस्त सोडून मुख्याध्यापकाचा मुलगा जयराज देशमुख यांना शिक्षणाधिकारी अशा गरुड यांनी दिनांक २२ जून २०२४ ला एकाच दिवशी वैयक्तिक मान्यता आणि सेवा सातत्य देऊन १६ जुलै २४ ला सेवा शालार्थ साठी शिक्षण उपसंचालकाकडे शिफारस प्रस्ताव पाठवला आणि अनुकंपा पात्र जन कुलकर्णी ला धावून जयराज देशमुख यांचे वेतन चालू केले. यामुळे आता या संस्थेत रिक्त जागा नसल्याने किरण कुलकर्णी कुटुंबाला भटकंती करावी लागणार आहे आज दिनांक २६ रोजी अन्यायग्रस्त किरण कुलकर्णी त्याच्यासोबत लहान तीन आणि पाच वर्षाचे मुलं आणि पत्नी शिक्षणाधिकारी अशा गरुड यांच्याकडे न्याय मागण्यासाठी आले असता अशा गरुड यांनी कार्यालयातून पळता पाय घेतला म्हणून अन्यायग्रस्त कुलकर्णी यांनी शिक्षक सेनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे यांना बोलून घेऊन शिक्षणाधिकारींनी केलेल्या अन्यायाबद्दल सांगितले आणि शिक्षक सेनेला लेखी दिले न्याय देण्याची माग विनंती केली यावेळी शिक्षक सेनेच्या वतीने राखे यांनी सदरील बाब शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद यांना भ्रमणध्वनी द्वारे झालेल्या प्रकाराबद्दल माहिती दिली. अन्यायग्रस्त किरण कुलकर्णी याची मागणी पूर्ण होईल होणार नाही तोपर्यंत शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय सोडण्यात येणार नाही यावेळी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष गुलाब हरकळ ही उपस्थित होते. यावेळी काही इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे पत्रकार उपस्थित होते त्यांना शिक्षण अधिकारी आशा गरुड यांनी अपमानास्पद वागणूक दिली.

शेवटी अन्यायग्रस्त किरण कुलकर्णी यांना लेखी देत आणि शिक्षण उपसंचालक झाला दिलेले वैयक्तिक मान्यता रद्द करण्याची शिफारस आशा गरुड यांनी पाठवली. यावेळी शिक्षक सेनेचे विभागीय अध्यक्ष यांनी या प्रकरणाचा छडा लावत राज्य अध्यक्ष आमदार ज.मो. अभ्यंकर साहेब यांच्याकडे हे प्रकरणाची सविस्तर माहिती देऊन येणाऱ्या अधिवेशनात लक्षवेधी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# डॉ सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद




परभणी ।प्रतिनिधी

कृष्णाई ग्रीन पार्क प्रतिष्ठान व सिद्धार्थ हत्तीअंबीरे मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २७ मे रोजी गंगाखेड रोड येथील कृष्णाई ग्रीन पार्क येथे कार्यक्रम संपन्न झाला. शिबिराचे उद्घाटन भंते मोगलायन व जोशी गुरु यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी कृष्णा एक ग्रीन पार्क प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष हनुमान गायकवाड हे होते. यावेळी सत्कारमूर्ती डॉ सिद्धार्थ हत्तीअंबीरे, पीआरपी चे मराठवाडा अध्यक्ष ज्येष्ठ नेते गौतम मुंडे,माजी नगरसेवक सुशील कांबळे, डॉ प्रकाश डाके, प्रा.डॉ भीमराव खाडे, भगवान जगताप, पी.टी प्रधान,प्रा डॉ राजेश रनखांब यांची उपस्थिती होती.

यावेळी जोशी गुरु यांनी डॉ सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांनी सामाजिक धार्मिक शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करत आंतरराष्ट्रीय स्तरावर मजल मारली आहे. सर्व समाजातील आणि सर्व स्तरातील लोकांचा मोठा जनसंपर्क त्यांचा आहे सामाजिक चळवळीमध्ये अतिशय सक्रियपणे त्यांनी कार्य करून लोकांच्या अनेक अडचणींना सोडवण्याचं काम ते नेहमी करत असतात आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त हे रक्तदान शिबिर आयोजित करून मानवतेचा व माणुसकीचा संदेश या माध्यमातून दिला आहे रक्तदानाने मानसे जोडले जातात आणि माणसं जोडण्याची कामे सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांनी मोठ्या प्रमाणात केली आहे हीच त्यांची खरी शिदोरी आहे असे म्हणत त्यांनी शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांनी देखील त्यांना शुभेच्छा दिल्या. सर्व उपस्थित मित्रपरिवाराच्यावतीने त्यांना भव्य पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना हत्तीआंबिरे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान बुद्ध यांच्या विचारांना समर्पित कार्य करण्याचा माझा प्रयत्न आहे माझ्या कमाईच्या ८० टक्के वाटा मी समाजाच्या प्रत्येक घटकासाठी विविध उपक्रम राबवून घेण्याचा प्रयत्न करत आहे आपल्या सर्वांच्या शुभेच्छांचे पाठबळामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो आहे भविष्यातही मोठ्या प्रमाणात सामाजिक बांधिलकी जपत विविध समाज उपयोगी उपक्रम राबविण्याचा माझ्या वतीने मी प्रयत्न करेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हनुमान गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन राहुल वाहिवळ यांनी केले.यावेळी मोठ्या प्रमाणात तरुणांनी रक्तदान केले. यशस्वी करण्यासाठी कृष्णा एक ग्रीन पार्क प्रतिष्ठान चे अध्यक्ष मकरंद बानेगावकर, सचिव रमेश सिद्धेवाड, सह सचिव विशाल देशमुख,कोषाध्यक्ष हनुमान गायकवाड राजेश भांगे,

# सारंग स्वामी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा : वर्गमित्रांनी जून्या आठवणींना दिला उजाळा




परभणी (प्रतिनिधी)

श्री सारंग स्वामी विद्यालयात रविवार २५ मे रोजी २००५-२००६ दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेचा एक दिवस माजी विद्यार्थ्यांनी गाजविला. यात सुरुवातीला शिक्षक व शिक्षका यांचे फुल टाकत विद्यार्थीनी स्वागत केले.त्यानंतर राष्ट्रगीत झाले. सरस्वती पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी आयोजक माजी विद्यार्थ्यांचा वतीने तत्कालीन माजी शिक्षक, विद्यार्थी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या वतीने शाल, श्रीफळ, फुलांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी धर्माधिकारी तर व्यासपीठावर कवडी, किर्तनकार, मठपती, फुलारी, सेवक बोरकर मामा व सुमित यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिक्षक व माजी विद्यार्थी यांनी मनोगत व्यक्त केले. जुन्या आठवणीना उजाळा दिला. त्यानंतर सर्व विद्यार्थी वर्गात बाकावर बसुन १९ वर्षे अगोदरच्या आठवणी ताज्या केल्या. यावेळी ते भावुक झाले होते. उपस्थित शिक्षकांनी वर्गात येऊन हजेरीपट घेतली. विद्यार्थीना शिकवुन मार्गदर्शन केले. त्यानंतर स्नेह भोजन झाल्यावर संगीतखुर्ची, विविध खेळ खेळण्यात आले.

कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी वैभव पत्रे, बालाप्रसाद इंदाणी, प्रशांत वैद्य, श्रीकांत मातेकर, किरण मैड, अमोल पाठक, श्रीपाद देशमुख, प्रताप कातकडे, शिवराज यादव, अक्षय देशमुख, स्नेहल पाटील, अलका कटारे, आश्विन देवकर, ज्योती शिंदे, गायत्री देशपांडे, वनमाला डुकरे, श्वेता पोटेकर यांनी पुढाकार घेतला.



# पालम तालुक्यात मॉन्सूनपुर्व पावसाची हजेरी

## धोंढी नदीला आला पूर; चार तास वाहतूक बंद

पालम (प्रतिनिधी)

तालुक्यात मागील काही दिवसांपासून मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस पडत असून या अवकाळी पावसामुळे शेतीची हंगाम पूर्वीचे कामे रखडले आहेत. तर लोंढे नदीला पूर आल्याने चार तास वाहतूक विस्कळीत झाली. शेतकऱ्यांनी शेती कामांना प्राधान्य देऊन पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू केली आहेत. काही दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे सर्व शेतीकामांचा खेळ खंडोबा झाल्याने शेतकऱ्यांनी शेती कामे बंद ठेवली आहेत. या अवकाळी पावसामुळे शेती कामे थांबल्याने शेतकरी हैराण झाले असल्याचे दिसून येत आहे. तर तालुक्यातील धोंडी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आल्यामुळे पालम रस्ता बंद झाला आहे. यामुळे सात गावचा चार तास संपर्क तुटला. शेतकरी वर्ग, प्रवासी हैराण झाले आहेत. मागील काही दिवसांपासून शेतकऱ्यांनी शेती कामांना प्राधान्य देऊन पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू केली आहेत. पण काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने

हजेरी लावल्याने शेती कामे ठप्प झाली आहेत. येत्या काही दिवसातच मृग नक्षत्राचे आगमन होणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीचे कामे आटोपण्याची गडबड सुरू केली आहे. या अवकाळी तसेच संततधार रिमझिम पावसामुळे शेतकऱ्याची शेती कामे थांबल्याने शेतकरी हैराण झाले असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा वेळेवर सुरु होण्याच्या आशेने जुन महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून शेतकरी खरिप हंगामाची तयारी सुरु करतात. मात्र अनपेक्षित व अवेळी पडणारा पाऊस शेतकऱ्यांसाठी अडचणी निर्माण करणारा ठरत आहे.या नद्यांच्या पूलाचे काम फार संथगतीने सुरू आहे. त्यामूळे वाहतूकीस अडचण होते. याची दखल गुत्तेदाराने घेणे गरजेचे आहे.

# अभाविपच्या ग्रामानुभुती शिबीरात विद्यार्थांना ग्रामीण संस्कृती चे दर्शन

बदनापूर ।प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व विकासार्थ विद्यार्थी जालना जिल्हा आयोजित ग्रामानुभुती शिबीर या शिबिरामध्ये पहिल्या दिवशी उद्घाटन सत्र पार पडले यामध्ये अभाविप चे जिल्हाप्रमुख प्रा नाना गोडबोले , जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे , शिबिर प्रमुख लहू किंगरे , यांनी या सत्राचे उद्घाटन केले व जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे यांनी प्रस्तावना केली तर या तीन दिवसाच्या शिबीरा मध्ये काय काय होणार आहे आणि अभाविप गेल्या ७६ वर्षापासून अविरतपणे शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये काम करत आहे या शिबिरामध्ये सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सर्व सत्रामध्ये सहभाग घ्यावा व उत्साहाने या शिबिराचा आनंद घ्यावा असे प्रतिपादन प्रा नाना गोडबोले यांनी केले व शिबीर प्रमुख लहू किंगरे यांनी ३ दिवसाच्या शिबिरामध्ये काय होणार आहे आणि व्यवस्था कशाप्रकारे असेल हे सांगितले व सूत्रसंचलन पवन नरवडे यांनी केले आणि भगवद् गीता अभ्यासक तुलजेस जी चौधरी यांनी त्यांच्या अमृतवाणीतून विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचे व



समजेल असे सोप्या भाषेत भगवद् गीतेचा सार मांडला आणि विद्यार्थ्यांना नांगर तासातील इतिहासात सांगण्यात आला आणि त्यानंतर ट्रेकिंग चा आनंद सुद्धा विद्यार्थ्यांनी मनमोहकपणे घेतला व वनभोजना चा सुद्धा अनुभव यामध्ये विद्यार्थ्यांना आला त्यानंतरचे सत्र प्रा डॉ रामेश्वर पाटील यांनी घेतले आणि भारत पाकिस्तान मधील युद्ध यामध्ये भारताने चालवले मिशन सिंदूर बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली आणि प्रा डॉ रामेश्वर पाटील म्हणाले की देशभक्ती ही सच्ची ईश्वर भक्ती है याचे लघु दर्शन मला आज या ग्रामानुभुती शिबिरामध्ये दिसत आहे अशाप्रकारे विविध सत्र खेळ , वादविवाद स्पर्धा , गीत गायन , असे वेगवेगळे कार्यक्रम या शिबिरात घेण्यात आले



# एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री नोंदणी अमलात आणू नका

## अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी

मुंबई / प्रविणभाऊ पवार

जमीन विकसन विक्रीच्या पावर ऑफ ऍटोनी व जमीन खरेदी विक्री दस्त नोंदणी या संदर्भात राज्य शासनाच्या एक राज्य एक दस्त नोंदणी प्रणाली थकित करण्यात यावी ही मागणी करत आज अखिल भारतीय मराठा महासंघ मुंबई विभागाच्या वतीने मा. सतिश बागुल उपजिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना एक निवेदन देण्यात आले.मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशानुसार निवेदन देते वेळी मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष प्रविणभाऊ पवार, मुंबई हंगामी अध्यक्ष अशोक देसाई, जिल्हा दक्षिण मध्य जिल्हा अध्यक्ष सचिन शिंदे, कायदेविषयक सल्लागार एड. रघुनाथ गावडे, मुंबई युवा उपाध्यक्ष संदीप देसाई, क्षत्रिय मराठा सेवा संस्थेचे उपाध्यक्ष विजय बागवे, संघटक विश्वनाथ अनभवने उपस्थित होते. निवेदनाच्या प्रति, स्थानिक आमदार राज्याचे मंत्री आशिष शेलार, आमदार वरुन सरदेसाई, आमदार पराग अळवणी

# उगवणक्षमता तपासणी व बीज प्रक्रिया ठरेल पिकासाठी उपयुक्त

सोयाबीन उत्पादकांनी घरगुती बियाणे वापरणे अधिक फायद्याचे- कृषी सहायक पी.वाय.पुंड

घनसांवगी ।प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात कृषी विभागातर्गत मौजे आंतरवाली दाही,भुतेगांव व शेवगळ या गावामध्ये खरीप हंगामात घ्यावयाच्या विविध मोहिमेंतर्गत बीज प्रक्रिया मोहीम कार्यक्रम घेण्यात आले यावेळी कृषी सहायक श्रीमती पी.वाय.पुंड यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की घरगुती सोयाबीन उगवण क्षमता तपासणी व बीज प्रक्रिया ठरेल पिकासाठी उपयुक्त सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांना कृषी विभागाचा सल्ला कमी खर्चात व शाश्वत उत्पादन घेण्यासाठी सोयाबीन उत्पादकांनी घरगुती वापरणे अधिक फायद्याचे ठरेल फक्त ते वापरण्यापूर्वी त्याची




उगवण क्षमता तपासून त्याची पेरणी करावी तसेच बीज प्रक्रिया करणे फायद्याचे ठरेल सोयाबीन हे स्वपरागसिंचित पीक आहे या पिकाचे सर्वच वाण सरळ वाण आहेत त्यामुळे दरवर्षी बियाणे बदलाची आवश्यकता नाही एकदा प्रमाणिक बियाणे वापरल्यानंतर त्याच्या उत्पादनातून येणारे बियाणे पुढील दोन वर्षांपर्यंत वापरता येते शेतकऱ्यांनी स्वतः कडील बियाणे वापरल्यास उत्पादन खर्च कमी होईल.घरगुती सोयाबीन उगवण क्षमता तपासणी चाचणी माती परीक्षण या मोहिमांची प्रात्यक्षिके घेतली यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना खरीप हंगामामध्ये येणाऱ्या विविध अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले यासाठी त्यांना तालुका कृषी अधिकारी डॉ.सखाराम पवळ, मंडळ कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक श्री भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच व प्रगतशील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे पोट विकार, मूत्रविकार शिबिर संपन्न

## लॅप्रोस्कॉपिक सर्जन डॉ दीपक शिंदे रविवारी तिरुपती हॉस्पिटल येथे उपलब्ध असणार

बीड /प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नगर नाका लाईफ लाईन हॉस्पिटल समोर नव्याने सुरू झालेली तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि स्पाईन केअर सेंटर च्या वतीने मंगळवारी घेण्यात आलेल्या मोफत पोट विकार मूत्रविकार पित्ताशयाच्या मोफत तपासणी शिबिरात शहरातील, जिल्ह्यातील शेकडो रुग्णांनी मोफत तपासणी व मार्गदर्शन घेऊन आपल्या विकाराबद्दल छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक सर्जन पोट विकार, मूत्रविकार, पित्ताशय तज्ञ डॉ दीपक शिंदे यांना आपल्या विकाराबद्दल अडचणी सांगून योग्य उपचार मार्गदर्शन, मेडिसिन घेण्यात आले..



जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ तथा अस्थिरोग तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे खास बीड करांच्या सेवेकरिता पोट विकार,मूत्रविकार, पित्ताशय,मुळव्याध ,हर्निया, अपेंडिक्स इत्यादी विकारावर मोफत तपासणी करिता व मार्गदर्शन करिता छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध पोट विकार मूत्रविकार तज्ञ डॉ दीपक शिंदे यांचे मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.. या शिबिरामध्ये शहरातील गरजू रुग्णांनी लाभ घेऊन आपल्या विकाराबद्दल समस्या जाहीर केल्या तसेच सुप्रसिद्ध मूत्रविकार व पोट विकार तज्ञ डॉ दीपक शिंदे यांनी रुग्णांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना मोफत तपासणी व मार्गदर्शन केले तसेच ❊प्रत्येक रविवारी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड येथे रुग्णांच्या सेवेकरिता उपलब्ध राहणार असल्याचे कळवले❊ गरजू रुग्णांनी पोट विकार, मूत्र विकार, पित्ताशय इत्यादी आजारावर उपचार घेण्यासाठी तिरुपती हॉस्पिटल येथे संपर्क साधावा ७७७०००३२२९ ८६६८२१२३३१ असे आवाहन करण्यात आले आहे.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या जालना जिल्हाध्यक्ष पदी डॉ. रमेश तारगे यांची निवड

घनसावंगी ।प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्राहक पंचायतची नवीन जिल्हा कार्यकारिणी दिनांक २६ मे रोजी जालना येथील विश्राम गृहात पार पडली असून ही नवीन कार्यकारिणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे मराठवाडा प्रांत अध्यक्ष विलासजी मोरे यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आली असून जुन्या कार्यकारिणीतील जिल्हासचिव पदावर असलेले डॉ. रमेश तारगे यांची त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन एकमताने त्यांची जिल्हाध्यक्ष या पदावर निवड करण्यात आली. तसेच माजी जिल्हाध्यक्ष बालाप्रसाद जेथलिया यांची जिल्हासंघटनमंत्री म्हणून



तर उपाध्यक्ष धर्मा खापरे, सहसंघटन मंत्री सुरेंद्र पोतदार, सचिव राहुल काळे, कोषाध्यक्ष लक्ष्मी नारायण मानधना,जिल्हा कार्यालय प्रमुख राजेश लहामगे, विधी आयाम मधुकर सोनूने, सह विधी आयाम शेख वसीम, महिला सदस्य शेख सलमा, सल्लागार म्हणून डी. पी. पाटील गोळेगावकर, पर्यावरण प्रमुख देवानंद चित्राल, रोजगार प्रमुख हनुमान भगत तर सदस्य म्हणून बाबासाहेब हेमके, बन्सी पवार, हरिभाऊ कदम, रमेश गुंजाळ, अदी पदाधिकारी यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी जालना जिल्ह्यात अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केल्यानंतर तालुका स्तरीय लोकशाही दिन, ज्ञानराधा मल्टीस्टेट बैकेचा घोटाळा यासह सर्व सामान्य ग्राहकाचे प्रश्न त्यामध्ये शेतकरी आत्महत्या अनुदान. जातीचे प्रमाणपत्र यासारखी असंख्य कामे मार्गी लागले त्या धरतीवर इतर जिल्ह्यात काम सुरु झाले त्यामुळे जालना जिल्याचे काम कौतुकास्पद असल्याचे मत देवगीरी प्रांत प्रमुख डॉ विलास मोरे यांनी बैठकीत माडंले यावेळी जिल्हा कार्यकारिणी ची निवड करुन जालना जिल्हा अध्यक्ष पदी ग्राहक संरक्षण परिषद चे अशासकीय सदस्य डॉ रमेश तारगे यांची जालना जिल्हा अध्यक्ष पदी निवड केल्याची बैठकीत घोषणा केली. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे घनसावंगी तालुकाध्यक्ष मारोती सावंत, गणेश गोरे, हरी गावडे, मनेश हेमके यांची उपस्थिती होती.



# मराठा महासंघ नाम फलकाचे अनवावरण पाचाड किल्ले राजगडच्या पायथ्याशी

मुंबई ।प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठा महासंघ महाड तालुका नाम पालकांच्या अनावरण उद्घाटन सोहळा ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त औचित्य साधून किल्ले रायगड च्या पायथ्याशी पाचाड रोड, ता.महाड, जिल्हा रायगड येथे करण्यात आले.

या प्रसंगी कोकण विभागीय अध्यक्ष प्रविणभाऊ पवार, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख रामचंद्र भिलारे, महाड तालुका अध्यक्ष काशीराम लामजे, नाईक मराठा समाज अध्यक्ष विठ्ठल लामजे, पुनाडेवाडी गाव सरपंच जयेश लामजे, पेण तालुका अध्यक्ष नितीन चव्हाण, पनवेल तालुका अध्यक्ष अर्जुन सावंत, दक्षिण मध्य मुंबई जिल्हा अध्यक्ष सचिन शिंदे, रविंद्र कुडपाने आदी मान्यवर उपस्थित होते.

# युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांच्या वतीने बीड शहरात १०१ झाडांची लागवड

प्रतिनिधी । बीड

उन्हाळ्यात बीडचा पारा ४४ अंशावर गेल्याने नागरिकांच्या जिवाची लाही-लाही झाली. युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी तेव्हाच जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला होता. मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्याने त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ यासह सावली, फळ देणारे आणि वर्षानुवर्ष टिकणारे झाडे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी लावले. या उपक्रमाबद्दल यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. वृक्ष कमी झाल्याने त्यात अणखी भर पडली. प्रत्येकानी किमान दोन झाडे लावले पाहिजेत असे फक्त सोशल मीडियावर सेट्स ठेवले जाते. प्रत्यक्षात मात्र कृतीत ते उतरत नाही. मात्र युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव कसलाही मुहूर्त, कोणतेही कारण, कशाचेही औचित्य न साधता एक सामाजिक उपक्रम राबवला



आहे. त्यांनी त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ हे झाडे लिंबाजी जाधव, महादेव मतकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख) विलास मस्के, फुलचंद नेवाळे, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव, सचिन गाडे, गणेश नेवाळे, विश्वनाथ जाधव, रामदास कदम यांच्या उपस्थितीमध्ये लावले.आम्ही लावलेले वृक्ष हे एकादा उपक्रम राबवायचा आहे म्हणून लावले नाहीत. लावलेले प्रत्येक झाड जगवण्यासाठी आम्ही मेहनत घेणार आहोत. त्यामुळेच आम्ही चिंच, नारळ, आंबा, जाम,लिंब,वड, पिंपळ यासारखे सावली आणि फळ देणारे झाडे निवडली आहेत.

# जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न

बीड /प्रतिनिधी

त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात एका भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात निवारा केंद्रातील सर्व अनाथ आणि बेघर लाभार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नवोदय विद्यालय, वसमत येथील इतिहास विषयाचे शिक्षक आणि प्रसिद्ध कवी भगवानराव वंजारे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यात माता रमाई यांचे स्थान किती महत्त्वाचे होते, हे सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत उपस्थितांना समजावून सांगितले. त्यांनी माता रमाई यांच्यावर आधारित एक कविता तसेच एक भावस्पर्शी गाणं सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमात व्यवस्थापक राजू वंजारे यांनी माता रमाई यांचा जीवनपट सादर करत त्यांच्या त्यागमय आणि संघर्षमय



जीवनाची माहिती दिली.

या कार्यक्रमाला कृषी विभागाचे अधिकारी बाबासाहेब कोकाटे, पोलीस खात्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रेमचंद वंजारे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, काळजीवाहक छाया सरोदे, मंदाताई सुभाष वंजारे, यश वंजारे यांच्यासह मोठ्या संख्येने अनाथ व बेघर लाभार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या माध्यमातून माता रमाई यांच्या कार्याची आणि योगदानाची उजळणी करण्यात आली आणि उपस्थितांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.